International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# नजुबाई गावित यांचे आदिवासी चळवळीतील योगदान

**रंजना धाकट शनवार[1], डॉ. बी .ए. राजपूत[2]**

[1] *संशोधक विद्यार्थी, मराठी संशोधन केंद्र, मुंबई विद्यापीठ रानडे भवन*

[2] *संशोधक मार्गदर्शक,*

*मराठी विभाग, कॉ. गोदावरी शामराव परुळेकर महाविद्यालय तलासरी, ता.तलासरी,जि. पालघर*

*Corresponding Author – रंजना धाकट शनवार*

**DOI - 10.5281/zenodo.17656377**

**प्रस्तावना :**

भारतात ज्यावेळी परकीयांनी आक्रमणे केली त्यावेळी तेथील वास्तव्यास असलेल्या आदिवासी जमातींनी तीव्रपणे विरोध केला. भिल्ल, महादेव कोळी, गोंड अशा अनेक जमातीच्या लोकांनी कार्य केल्याची नोंद आजही इतिहासात उल्लेखनीय स्वरुपात उपलब्ध आहे. एकीकडे परकीय राजवटी तर दुसरीकडे समाजात असणारी सावकारी पद्धत, वेठबिगारी यामुळे आदिवासी समाजाला अन्यायाचा सामना करावा लागत होता. आपल्या आदिवासी समाजात होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी व स्वतःचे अस्तित्व प्राप्त करण्यासाठी काही आदिवासींनी चळवळी, आंदोलने करण्यास प्रारंभ केला. काही आदिवासी सुधारकांनी सुधारणावादी चळवळीची सुरुवात केली. याच सुधारणावादी चळवळीत एक आदिवासी स्त्री म्हणून नजुबाई गावित यांचे नाव घ्यावे लागेल.

आदिवासी मावची समाजात वाढलेल्या नजुबाईला लहानपणापासून आपल्या समाजावर होणाऱ्या अन्याय - अत्याचाराची चीड होती. सावित्रीबाई फुले यांना आपला आदर्श मानून कार्यास सुरुवात केली. चळवळीस प्रारंभ करण्यापुवी त्यांनी राजकीय पक्षाचे पाठबळ मिळविले. त्यांनी मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षात दाखल होवून समाज परिवर्तनाचे कार्य आपल्या हाती घेतले. आदिवासी समाजाच्या समस्या आणि त्यातही महिलांच्या समस्यांचा त्यांनी अभ्यास केला. समाजहितासाठी काही चळवळीचा प्रारंभ करून सुधारणाकडे अधिक लक्ष दिले. तृष्णा, भिवा फरारी आणि नवसा भिलनीचा एल्गार अशा काही साहित्यातून त्यांनी आदिवासी समाज रेखाटण्याचा प्रयत्न केला.

**महत्वाचे शब्द :** वेठबिगारी, मार्क्सवादी, परिवर्तन

**संशोधनाचे उद्दिष्टे:**

१) नजुबाई गावित यांच्या सामाजिक सुधारणांचा हेतू स्पष्ट करणे .
२) आदिवासी समाज चळवळीतील एक कार्यकर्ती म्हणून त्यांचा अभ्यास करणे.
३) एक आदिवासी साहित्यिक म्हणून त्यांचा अभ्यास करणे.

**गृहितके :**

१) नजुबाई गावित यांच्या सामाजिक सुधारणांचा समाजावर प्रभाव पडलेला दिसून येतो.

२) आदिवासी चळवळीतील एक आदिवासी महिला म्हणून त्यांचा अभ्यास करता येतो.

३) आदिवासी साहित्यातून त्यांनी आपला समाज रेखाटण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

**संशोधन पद्धती :**

व्यष्टी संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**नजुबाई गावित यांचे आदिवासी समाजातील कार्य :**

चौथी पर्यंत शिक्षण घेतलेल्या अगदी लहान वयातच लग्न झालेल्या नजुबाई गावित आदिवासी समाजातील एक कार्यकर्त्या आहेत. आदिवासी समाजाचे संस्कार आत्मसात केलेल्या नजुबाई नेहमी समाजात, शाळेत भिनलेली विषमता, जातीयता पाहून अस्वस्थ होत असत. आपल्या आदिवासी समाजातील दारिद्र्य आणि शाहू लोकांची श्रीमंती हा फरक त्यांना त्रासदायक वाटत होता. श्रीमंत आणि गरीब हा भेद कसा निर्माण झाला? आपल्याच वाट्याला गरिबी आहे यामागच कारण काय? असे अनेक प्रश्न त्यांना भेडसावत असत.

१९७३ साली कॉ. शरद पाटील यांनी आदिवासी समाजाला दिलेल्या भाषणाने नजुबाई प्रभावित झाल्या होत्या. आदिवासी समाजाची गरिबी, त्यांचे होणारे शोषण अशा मुद्द्यावर केलेले भाष्य नजुबाईला पटले. याच विचाराने प्रेरित होवून त्यांनी मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षात प्रवेश केला. दारिद्र्यमय परिस्थितीत वाढलेल्या नजुबाईंना आपल्या आदिवासी समाजाविषयी तळमळ असल्याने समाजपरिवर्तन करून समाजाला जागृत करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. कॉ. शरद पाटील यांचे सानिध्य लाभल्यानंतर नजुबाई गावित यांनी आपल्या जीवनात बदल घडवून आणला. तेथूनच खऱ्या अर्थाने आपल्या सामाजिक कार्याला सुरुवात केली.

**१) सामाजिक सुधारणावादी चळवळ :**

सामाजिक सुधारणावादी चळवळ करायची असेल तर राजकीय पक्षाचा पाठींबा असणे गरचेचे आहे याची जाण असल्यामुळे नजुबाईंनी मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षात प्रवेश केला. समाजातील एक गाव एक पाणवठा, विषमता निर्मुलन यासारख्या सामाजिक चळवळीमध्ये नजुबाईंनी कार्य केले. १९४७ साली ऐतिहासिक आंदोलनामुळे त्यांनी संघर्षशील किसान चळवळीत प्रवेश केला. आदिवासी समाजातील स्त्रियांचे प्रतिनिधित्व नजुबाईने केले. या महिलांवर अन्याय होत असल्याने त्यांनी याविरोधात जाब विचारण्याचा प्रयत्न केला. भूमिहीन आदिवासींना शेतीचे मशागत करण्याचे तंत्र आत्मसात करून दिले. १९७८ साली जाती व्यवस्थेच्या प्रश्नांवर गंभीर होवून मार्क्सवादी पक्षातून बाहेर पडल्या आणि सत्यशोधक कम्युनिष्ट पक्षाची स्थापना केली. अशा सामाजिक सुधारणा करताना त्यांना बंदिवासातही जावे लागले. परंतु त्यांनी या कार्याला स्थागिती न देता परिवर्तनाचे हे कार्य पुढे सुरूच ठेवले.

**२) स्त्रीमुक्तिवादी चळवळ :**

एक आदिवासी कार्यकर्त्या म्हणून त्यांनी जे अनुभवले त्याच्यात बदल करण्याचा प्रयत्न केला. सत्यशोधक कष्टकरी महिला सभेच्या अध्यक्षा म्हणून स्त्रियांच्या चळवळीचे नेतृत्व करीत असताना त्यांनी महत्वाची भूमिका घेतलेली दिसते. आदिवासी स्त्रियांना हिंदू कोड बिल व द्विभार्या प्रतिबंधक कायदा लागू करावा यासाठी त्यांनी स्त्री मुक्ती संघटनेची स्थापना केली. त्याचबरोबर धुळे जिल्ह्यात श्रमिक महिला संघाची स्थापनाही त्यांनी केली. आदिवासी समाजात प्रचलित असणाऱ्या बहुपत्नीत्व आणि बहुपतीत्वाला आळा बसला पाहिजे हे एकमात्र ध्येय नजुबाईचे होते.

काळ बदलला तरी आजही आदिवासी स्त्रीला तिचे अधिकार प्राप्त झाले नाहीत. तिला जात पंचायतीचा सामना करावा लागत आहे. या विचाराने स्वस्थ न बसता त्यांनी विविध मंचावरून भाषणे करून आदिवासी स्त्रीयांबाबतचे भेडसावणारे प्रश्न मांडलेले दिसून येतात.

**३) साहित्यिक चळवळ :**

आदिवासी सामाजिक कार्यकर्त्या असलेल्या नजुबाई एक साहित्यिकही आहेत. त्यांनी समाजात जे पहिले जे अनुभवलेले ते साहित्यात मांडण्याचा प्रयत्न केला. नजुबाई म्हणतात, “आदिवासी समाजाच्या व्यथा, वेदना साहित्यात मांडायच्या असेल तर बोलीभाषेसहित आदिवासी जीवन चितारणे गरजेचे आहे.” त्यांनी लेखनाची सुरुवात सत्यशोधक मार्क्सवादी मासिकातून केली.१९९५ साली त्यांची ‘तृष्णा’ ही आत्मनिवेदनपर कादंबरी प्रकाशित झाली. त्यानंतर २००८ मध्ये ‘भिवा फरारी’ ही ऐतिहासिक कादंबरी आली. २०१३ मध्ये ‘नवसा भिलणीचा एल्गार’ हा सात कथांचा संग्रह प्रकाशित झाला. या सर्व साहित्यातून त्यांनी आदिवासी समाज चित्रित करण्याचा प्रयत्न केला. जणूकाही या साहित्यातून त्यांनी साहित्यिक चळवळ निर्माण केली.त्यांच्या या साहित्य लेखनाचा समाजावर अधिक प्रभाव पडलेला दिसून येतो. म्हणूनच नजुबाई आदिवासी समाजातील पहिली महिला कादंबरीकार व आत्मचरित्रकार आहेत.

**सारांश :**

आदिवासी चळवळीतील एक प्रणेत्या आणि साहित्यिक म्हणून नजुबाईचे नाव समाजात प्रचलित आहे. समाजात निर्माण झालेली विषमता नष्ट व्हावी या हेतूने चळवळीच्या माध्यमातून त्यांनी आवाज उठवला. आदिवासी समाजातील समस्या आपल्या साहित्यात मांडून समाज परिवर्तनाचे कार्य त्यांनी साहित्यातून केले. नजुबाई जगातील पहिल्या अदिवासी आत्मकथनकार ठरल्या. फक्त समाजासाठी लढायचे आणि समस्या सोडवायच्या हे एकच सूत्र त्यांनी हाती घेतले. आपल्या चळवळीतून आदिवासी समाजाचा आत्मविश्वास संपादन केला. सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात त्यांनी आपल्या समाजहिताची भूमिका घेऊन संघर्ष केला.

**निष्कर्ष :**

१) आदिवासी चळवळीतील एक प्रणेत्या म्हणून नजुबाईंना समाजात सन्मान प्राप्त झालेला दिसून येतो.

२) आदिवासी साहित्य लेखनातून नजुबाईने समाज परिवर्तनाचे कार्य केलेले दिसून येते.

३) समाजातील पहिली आदिवासी स्त्री लेखिका म्हणून त्यांच्या साहित्याचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

**संदर्भसूची :**


१) गावित माहेश्वरीमहाराष्ट्रातील आदिवासी , २००८ ,प्रथम आवृत्ती , एक शोध : साहित्य दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे

२) फड शत्रुघ्नआदिवासी साहित्य आणि , लोककला

३) गावित माहेश्वरीआदिवासी साहित्य विविधांगी , च ,आयामिन्मय प्रकाशन २०१५ मार्च ,

४) लोहकरे संजयआदिवासी साहित्य आणि कला , २०२२ प्रथमावृत्ती ,अथर्व प्रकाशन ,संस्कृती

५) गावित नजुबाई, तृष्णा कादंबरी सत्यशोधक माक्सवादी प्रकाशन प्रथम आवृत्ती १९९५

६) गावित नजूबाई, भीवा फरारी मावळाई प्रकाशन प्रथम आवृत्ती २००८

७) गावित नजुबाई नवसा भिलणीचा एल्गार सुगावा प्रकाशन पुणे द्वितीयावृत्ती २०१८